# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील इतर मागासवर्गाच्या यादीत काही उपजातींचा सामाजिक न्याय विभागाने संकेतस्थळावर (ऑनलाईन इंटरनेटवर) समावेश न केल्याबाबत**

**(१) ५९६८ (१०-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर मागासवर्गाच्या यादीत काही उपजातींचा शासनाने दिनांक १ जून, २००४ व दिनांक १८ ऑक्टोंबर, २०१३ रोजी समावेश केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील इतर मागासवर्गीयांच्या यादीतील अनुक्रमांक ८५ मध्ये काछी, शाक्य, मौर्य, मुराई, सैनी, कोइरी, कोयरी व कुशवाहा या उपजातींचा सामाजिक न्याय विभागाने संकेतस्थळावर (ऑनलाईन इंटरनेटवर) समावेश न केल्यामुळे या उपजातीमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा व रोजगारांपासून वंचित राहावे लागत असल्याची लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमानरास शासनाकडे तक्रार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर उपजातींच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक रोजगार विषयक सुविधा मिळणेसाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०८-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) दि.७-७-२०१५ अन्वये शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना शहरातील संत रामदास आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांच्या वसतिगृहात वीज नसल्याबाबत**

**(२) ७८४० (१०-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना शहरातील संत रामदास आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांच्या वसतिगृहात माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यापासून वीज नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच वीज, पाणी स्वच्छता, गरम पाणी, पुस्तके या सेवाही नावालाच असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तसेच चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०७-२०१५) :** (१) वीज बिलासाठी तरतूद उपलब्ध नसल्याने वीज पुरवठा खंडीत केला होता. परंतु कर्मचा-यांनी मध्यस्थी करुन वीजपुरवठा तात्काळ २ तासात पूर्ववत सुरु केला आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहात एचआयव्ही ग्रस्त विद्यार्थ्यांना ५% जागा राखीव ठेवण्याबाबत**

**(३) ८५८९ (१०-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समाजकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शासकीय, अनुदानित वसतिगृहात एचआयव्हीग्रस्त विद्यार्थ्यांसाठी ५ टक्के जागा राखीव ठेवण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २४ सप्टेंबर, २०१३ रोजी समाजकल्याण आयुक्त, पुणे यांनी त्यांच्या शिफारसींसह शासनाकडे सादर केल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-०७-२०१५) :** (१) होय.

(२) आयुक्त समाजकल्याण, पुणे यांचेकडून शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावास अनुसरुन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत शासकीय वसतिगृहांमध्ये एचआयव्ही ग्रस्त विद्यार्थ्यांना काही जागा राखीव ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संजय गांधी नगर, उल्हासनगर - ३ (जि.ठाणे) येथील कुष्ठरोगी, अपंग यांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(४) ८६२३ (०९-०४-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), रमेश कदम (मोहोळ), जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी नगर, उल्हासनगर - ३ जि.ठाणे येथील कूष्ठरोगी, अपंग यांचे पुनर्वसन करण्याची मागणी शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुरबाड नगर हायवे ते अंबरनाथ मंजूर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण अपूर्ण असल्याबाबत**

**(५) ८६२७ (०९-०४-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड नगर हायवे ते अंबरनाथ असा शासन मंजूर (डीपी) रस्ता असून शासनाने ५ ते ६ वर्षापूर्वी सदर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण मंजूर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम अद्यापपर्यंत पूर्ण झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (३१-०८-२०१५) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे गार्लिक फाटा अंबरनाथ (प.) ते बारवी डॅम अशा एकूण १२.५० कि.मी. व बारवी धरण ते मुरबाड फाटा १५.०० कि.मी. अशा एकूण २७.५० कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या डांबरीकरणाचे

काम सन २००८-०९ मध्ये हाती घेण्यात आले होते. सदर कामाचा कालावधी ९ महिन्याचा होता व विहित कालावधीत ते काम पूर्ण करण्यता आले होते. तसेच सदर कामाचा देखभाल दुरुस्तीचा कालावधी ३ वर्ष म्हणजेच दि.१८/११/२०१२ रोजी संपुष्टात आला आहे.

सद्यःस्थितीत गार्लिक फाटा ते बारवी डॅम या ५.५० मी. रुंदीच्या व १५ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे मजबुतीकरण व पुर्नडांबरीकरणाचे काम तसेच बारवी डॅम ते मुरबाड फाटा या १२.५० कि.मी. लांबीच्या व ३.७५ मी. रुंदीच्या डांबरी रस्त्याचे ५.७५ मी. पर्यंत रुंदीकरण, मजबुतीकरण व पुर्नडांबरीकरणाच्या कामासाठी महामंडळाकडून निविदा काढण्यात आल्या असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सामाजिक न्याय विभागाचे कार्यालयातील रिक्त पदे भरणेबाबत**

**(६) १०९८५ (०९-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजातील उपेक्षित घटकांना न्याय देण्यासाठी तसेच सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने अनेक योजना राबविल्या जातात परंतु या विभागामध्ये अद्यापपर्यंत ३० टक्के पदे रिक्त असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदामुळे शासनाच्या विविध योजना रखडल्याने ग्रामीण भागातील लाभार्थी योजनेपासून वंचित असल्याचेही आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विभागातील पदे अद्यापपर्य्ंत भरण्यात का आली नाही तसेच सदर रिक्त पदे भरण्यात येणार आहे काय

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-०६-२०१५) :** (१), (२) व (३) सामाजिक न्याय विभागात सुमारे २४ टक्के पदे सध्या रिक्त असून सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकारी/कर्मचारी यांच्याकडे सोपवून योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. तथापि रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेळघाटातील आदिवासींच्या समस्या सोडविण्याबाबत**

**(७) ११११७ (१०-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी भागात दिनांक २९ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या सुमारास मा.मुख्यमंत्र्यांच्या मेळघाट भेटी दरम्यान कोणत्या समस्या आढळून आल्या आहेत,

(२) असल्यास, सदरच्या समस्या सोडविण्याकरिता शासनस्तरावरून कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, सदरच्या उपाययोजनांची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०९-२०१५) :** (१), (२) व (३) मेळघाटच्या आदिवासी भागात दिनांक २९ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या सुमारास मा.मुख्यमंत्र्यांच्या भेटी दरम्यान आढळून आलेल्या समस्या व त्याबाबत केलेली उपाययोजना खालीलप्रमाणे आहे.

१. हिवरखेड ते धारणी येथील ३२ केव्ही लाईनच्या कामाकरीता आदिवासी विकास विभागाने मंजूर केलेले १४ कोटी रु. प्राप्त निधी अंतर्गत वीज वितरण कंपनीच्या परिमंडळ कार्यालय स्तरावर निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

२. ग्राम बाल विकास चौराकुंड २०१५ या वर्षात झोन सर्वेक्षण करुन बालकांची संख्या निश्चितीनंतर दोन्ही तालुके मिळून २० व्ही.सी.डी.सी. केंद्र सुरु करण्यात आलेले आहे.

३. जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची गैरहजेरी बाबत दोन शिक्षकांवर निलंबनाची कार्यवाही आणि १६ शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्या आहेत.

४. पाळणाघर योजना चौराकुंड - चिखलदरा व धारणी तालुक्यात एकूण ९२ पाळणाघरे सुरु करण्यात आली आहेत.

५. मेळघाट भागातील वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून जिल्हा परिषद आस्थापनेवरील वर्ग ३ ची रिक्त पदे मे, २०१५ मध्ये भरण्यात आलेली आहे.

६. अमरावती येथे सीटी स्कॅन कक्ष स्थापन करणे बाबत सहसंचालक, आरोग्य सेवा रुग्णालय (राज्यस्तर), मुंबई यांचेकडे जिल्हा शल्य चिकित्सक, अमरावती यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज, चंदगड, आजरा, भूदरगड, शाहूवाडी आदी तालुक्यात एमआयडीसीसाठी जमीन संपादित करण्याच्या कामास स्थानिकांनी केलेला विरोध**

**(८) ११२७३ (०४-०४-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज, चंदगड, आजरा, भूदरगड, शाहूवाडी आदी तालुक्यात एमआयडीसी प्रस्तावित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावित असलेल्या एमआयडीसीचे काम अद्यापही सुरू झाले नसतांनाही उक्त तालुक्यात तिस-या एमआयडीसी स्थापन करण्यासाठी जमीन संपादित करण्याच्या कामास शेतक-यांनी व रहिवाश्यांनी विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे ?

**श्री. सुभाष देसाई (३१-०८-२०१५) :** (१) कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज, चंदगड व आजरा या तालुक्यात औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात आले असून तेथे भूखंड वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे. तर भुदरगड तालुक्यातील औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यासाठी अधिसूचित केलेले क्षेत्राचे भूसंपादनास बहुतांश खातेदारांनी विरोध दर्शविला आहे. तथापि, संबंधित खातेदारांची बैठक घेवून मन वळविण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

शाहूवाडी तालुक्यात औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यासाठी अधिसूचित केलेले क्षेत्र संपादन करण्याची कार्यवाही तात्पुरती स्वरुपात स्थगित ठेवण्यात आलेली आहे.

(२) कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज, चंदगड, आजरा, भुदरगड, शाहूवाडी या तालुक्यात औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्याव्यतिरिक्त कोणताही नविन प्रस्ताव औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यासंदर्भात शासनाच्या विचाराधीन नाही. त्यामुळे भूसंपादन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सामाजिक न्याय विभागामध्ये अत्यल्प मानधनावर कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या जनसंपर्क अधिकारी, विधी अधिकारी व संगणक ऑपरेटर यांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत**

**(९) ११८४५ (१०-०४-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागामध्ये अत्यल्प मानधनावर कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या जनसंपर्क अधिकारी, विधी अधिकारी व संगणक ऑपरेटर यांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्यासाठी राज्यातील लोकप्रतिनिधींनी माहे जुन, २०१४ मध्ये वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-०६-२०१५) :** (१) होय.

(२) सामाजिक न्याय विभागामध्ये कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या जनसंपर्क अधिकारी, विधी अधिकारी व संगणक ऑपरेटर यांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्याची बाब मागणीच्या अनुषंगाने तपासण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जात पडताळणी समितीचे काम संथ गतीने होत असल्याबाबत**

**(१०) १२३३१ (१०-०४-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जात पडताळणी समितीचे काम संथ गतीने होत आहे, त्यामुळे शैक्षणिक सुविधा व नोकरीसाठी संबंधिताना वंचित राहावे लागत आहे हे खरे आहे काय, (विशेष करुन महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी, टेकरे कोळी इत्यादी जमातींना या संदर्भात)

(२) असल्यास, सर्व समित्यांमध्ये डिसेंबर, २०१४ अखेर समित्यांचे कामकाज सुरु झाल्यापासून किती प्रस्ताव दाखल झाले, किती निकाली काढले व किती प्रलंबित आहेत,

(३) असल्यास, मुदतीत प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी शासनाने काही वेळेचे बंधन घालून दिले आहे काय, असल्यास किती दिवसाचे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच दोषी संबंधितावर शासन काय कारवाई करणार आहे तसेच निपटारा सुरळीत व मुदतीत होण्यासाठी शासन जिल्हा स्तरावर पडताळणी कार्यालय उघडणार आहे काय,

(५) असल्यास, किती कालावधीत सदर पडताळणी कार्यालय उघडण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (११-०९-२०१५) :** (१) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे कामकाज महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महाराष्ट्र क्र.२३) व त्या अधिनियमाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने पारीत केलेले “महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३” मधील तरतुदीनुसार चालते. या अधिनियम व नियमातील तरतूदींची पूर्तता करणा-या दावेदारास तपासणी समित्या तात्काळ वैधता प्रमाणपत्र निर्गमित करतात.

(२) सर्व समित्यांकडे माहे डिसेंबर, २०१४ अखेर अंदाजे ७७१५९ प्रकरणे प्राप्त झालेली असून त्यापैकी अंदाजे ४४६११ एवढी प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत. त्यामुळे अंदाजे ३२५४८ इतकी प्रकरणे प्रलंबित आहेत.

(३), (४) व (५) अधिनियमातील तरतुदीमध्ये विशिष्ट कालावधी प्रकरण तपासणीसाठी विहित करण्यात आलेला नाही. प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दि.२८ एप्रिल, २०१५ अन्वये एक तज्ञ समिती गठीत करण्यात आली आहे. समितीचा अहवाल दि.६ जुलै, २०१५ रोजी शासनास प्राप्त झाला असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील हिंदू टोकरे कोळी जातीला प्रमाणपत्र देण्याबाबत

**(११) १२३३४ (१०-०४-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी जमातीचे प्रमाणपत्र देत असताना अर्जदारांनी १९५० पूर्वीच्या जातीविषयक पुरावा आवश्यक नाही, असा महत्वपूर्ण निकाल मुंबई उच्च न्यायालयाने सन १९९६ च्या सुमारास दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतांनाही उपविभागीय अधिकारी, अमळनेर यांनी चोपडा तालुक्यातील (जि.जळगांव) हिंदू टोकरे कोळी या जमातीतील लोकांना १९५० पूर्वीच्या जातीचा पुरावा सादर केला नसल्यामुळे अनुसूचित जामातीचे जात प्रमाणपत्रे अर्ज निकाली काढले जात असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला निकालानुसार तालुक्यातील हिंदू टोकरे कोळी जातीला प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. विष्णु सवरा (११-०९-२०१५) :** (१), (२), (३) व (४) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे कामकाज "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००, (२००१ चा महाराष्ट्र क्र.२३) व त्या अधिनियमाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने पारीत केलेले “महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३” मधील तरतुदीनुसार करण्यात येते. या नियमात नमूद केलेली कागदपत्रे व पुरावे अर्जदाराने सादर करणे आवश्यक आहे.

अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी उक्त नियमातील नियम ३(३) नुसार उमेदवाराने कागदपत्रे व पुरावे किंवा ३(४) नुसार शपथपत्र सक्षम प्राधिका-यांस देणे आवश्यक आहे.

अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज सक्षम प्राधिका-याकडून फेटाळण्यात आला असेल, तर अर्जदारास ३० दिवसांच्या आत संबंधित अपिलीय अधिका-याकडे (सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, संबंधित अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती) अपिल करण्याची तरतूद नियम क्रमांक ८ मध्ये करण्यात आलेली आहे.

---

## खेड तालुक्यातील (जि.पुणे) सेझबाधित शेतकऱ्यांच्या १५ टक्के जमीन परताव्याची मागणीस मान्यता दिल्याबाबत

**(१२) १२३९८ (१०-०४-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यातील (जि.पुणे) सेझबाधित शेतकऱ्यांच्या १५ टक्के जमीन परताव्याची मागणीला मा.उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी माहे जानेवारी, २०१५ च्या शेवट्च्या

आठवड्यात तत्वत: मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मान्यतेनुसार संबंधित कंपन्यांनी १५ टक्के जमिन परताव्याच्या मागणीसंदर्भात आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१४-०९-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

खेड विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये शेतक-यांच्या १५% परताव्याबाबत सामंजस्य कराराप्रमाणे खेड डेव्हलपर्स कंपनी स्थापन करण्यात आलेली आहे.

सदरचे १५% क्षेत्र हे वैयक्तीक शेतक-यांना न देता सदर कंपनीमार्फत १५% क्षेत्राचे भाग (Share) देण्यात आले आहेत. १५% परताव्याच्या क्षेत्राचे कामकाज हे खेड डेव्हलपर्स कंपनीमार्फत केले जाणार आहे. कंपनी स्थापन झालेली असून, कंपनीचे व्यवसायिक कामकाज अद्याप सुरु झालेले नाही.

---

**मातंग समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी स्थापन झालेल्या लोकशाहिर अण्णाभाऊ साठे महामंडळाला निधी मिळाला नसल्याबाबत**

**(१३) १२८३० (१०-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मातंग समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी स्थापन झालेल्या लोकशाहिर अण्णाभाऊ साठे महामंडळाला नोव्हेंबर, २०१४ हा महिना संपत आला तरी यावर्षीचा निधी मिळाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील मातंग समाजाची अनेक कर्ज प्रकरणे धूळ खात पडून आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचा निधी अद्यापपर्यंत न मिळण्याची कारणे काय आहे तसेच निधी केव्हापर्यंत प्राप्त होणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. राजकुमार बडोले (१७-०७-२०१५) :** (१) नाही.
(२) होय.
(३) सद्यःस्थितीत निधी प्राप्त झाला आहे. शासन आदेश दि.०२ डिसेंबर, २०१४ अन्वये कर्ज मंजूरी व कर्ज वितरणास स्थगिती देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील आडगांव येथील शासकीय वसतिगृहांतील मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांसाठी पाण्याचा नियमित पुरवठा नसल्याबाबत**

**(१४) १३३२९ (१०-०४-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील आडगांव येथील ५ शासकीय वसतिगृहांतील मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांसाठी पाण्याचा नियमित पुरवठा नसल्याने या विद्‌यार्थ्यांना दोन ते तीन वर्षापासून आवाराच्या शेजारी असलेल्या विहिरीवर पाणी आणण्यासाठी जावे लागत असल्यामुळे त्या विद्‌यार्थ्यांच्या जिवितास धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भातील तक्रार प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण व सहायक आयुक्त, समाजकलयाण, नाशिक यांचेकडून करुन त्यांनी याकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच यांस जबाबदार असणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

वसतिगृहासाठी पाण्याच्या पूर्वीच्या १ कनेक्शन व्यतिरिक्त आणखी ३ कनेक्शन घेण्यात आली असल्याने आता वसतिगृहातील विद्‌यार्थ्यांसाठी पुरेसा पाणी पुरवठा होत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांना मूलभूत सोयीपासून वंचित ठेवण्यात आल्याबाबत**

**(१५) १३३३५ (१९-०४-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील शासकीय वसतिगृहातील मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांना २ ते ३ वर्षापासून गाद्‌या, खाट, अंथरुण-पांघरुन पुरविण्यात आले नसून हिवाळ्यातसुध्दा विद्‌यार्थ्यांना जमिनीवर झोपावे लागत असल्यामुळे त्यांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शासकीय वसतिगृहातील विद्‌यार्थ्यांना शासकीय निर्णयातील निकषानुसार दूध, अंडी, फळे, मटन व नाश्ता दिला जात नाही हे ही खरे आहे काय, तसेच त्याना निकृष्ट प्रतीचे भोजन देण्यात येते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सुविधांपासून विद्‌यार्थी वंचित आहेत, ह्याबाबींकडे प्रादेशिक व जिल्हा

स्तरावरील अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत,हे खरे आहे काय ,
(४) असल्यास, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मूलभूत सोयीपासून वंचित ठेवून त्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या व विना पुरवठा वस्तुंची देयके मंजूर करण्यास जबाबदार असणाऱ्या प्रादेशिक उपायुक्त व सहायक आयुक्त, समाजकल्याण, नाशिक याचेविरुध्द कायद्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०७-२०१५) :**(१), (२) व (३) नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील अवैध नोकर भरती बाबत**

**(१६) १३७६० (१०-०४-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील अवैध नोकर भरती तात्काळ रदद करण्याबाबत पणन संचालक, पुणे यांनी दिनांक १६ डिसेंबर २०१४ रोजी वा त्या सुमारास राज्यातील सर्व विभागीय सह निबंध सह-संस्था, जिल्हा उपनिबंधक व सभापती /सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती यांना आदेशीत केले होते हे खरे आहे काय,
(२) सदर प्रकरणी अवैधरीत्या भरती केलेल्या कर्मचाऱ्यांची प्रकरणे तपासून अशा नियुक्त्या १५ दिवसात रद्द कराव्यात असे निर्देश दिले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, किती व कोणत्या बाजार समितीत अवैध भरती आढळून आली,
(४) असल्यास, शासनाने दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब बाजार समिती, चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभूर्णा व नागभीड बाजार समिती, सातारा जिल्ह्यातील फलटण बाजार समिती व जळगाव जिल्ह्यातील अमळनेर बाजार समिती इत्यादी ५ बाजार समित्यांमध्ये अवैध नोकर भरतीची प्रकरणे निदर्शनास आली आहेत.
(४) उपरोक्त ५ बाजार समित्यापैकी

१) कळंब जि.उस्मानाबाद संचालक मंडळ व सचिव यांच्या विरुध्द पणन अधिनियमाच्या कलम ४९ प्रमाणे कार्यवाही चालू आहे.

२) पोंभुर्णा बाजार समितीवर अवैधरित्या नियुक्त करण्यात आलेले उमेदवार रुजू झालेले नाहीत. तसेच सदर नवनियुक्त संचालक मंडळाने ठरावाद्‌वारे भरतीचा प्रस्ताव नामंजूर केलेला आहे. त्यामुळे संचालक मंडळाविरुध्द कार्यवाही करण्यात आलेली नाही.

३) चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड बाजार समितीमध्ये अवैध भरती प्रक्रिया राबविल्याबद्दल संचालक मंडळावर पणन अधिनियमाच्या कलम ४५ अन्वये संचालक मंडळ बरखास्त केले आहे.
४) सातारा जिल्ह्यातील फलटण बाजार समितीवरील अवैध नोकर भरतीन्वये नियुक्ती झालेल्या सेवकांच्या वेतनामुळे झालेल्या आर्थिक नुकसानीची चौकशी, पणन अधिनियमाच्या कलम ४० अन्वये सुरु आहे.
५) जळगांव जिल्ह्यातील अमळनेर बाजार समितीवरील अवैध नोकर भरतीबाबत शासनासमोर अपिल दाखल केले असून सदर अपिल सद्य:स्थितीत प्रलंबित आहे.

---

**सहायक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई शहर यांचे चौकशीबाबत**

**(१७) १३९९२ (१०-०४-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सहायक आयुक्त, समाजकल्याण, चेंबूर, मुंबई शहर यांना पद्मभूषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठानचे अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संदर्भात मुंबई विद्यापीठ अधिसभा सदस्य श्री.संजय वैराळ यांची तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर तक्रारींची चौकशी करुन त्या निकाली काढल्या आहेत काय, असल्यास त्यात काय निष्पन्न झाले,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२५-०८-२०१५) :** (१) मुंबई विद्यापीठ अधिसभा सदस्य श्री.संजय वैराळ यांनी पद्मभुषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठानचे अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून जादा फी/शुल्क आकारणे तसेच विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये सोयीसुविधा उपलब्ध न करणे या विषयाबाबत तक्रार केली आहे.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने सहायक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई उपनगर यांनी जादा शुल्क वसुलीच्या संदर्भात शासन निर्णय दिनांक १ नोव्हेंबर, २००३ मधील तरतूदीनुसार संबंधित महाविद्यालयाकडून खुलासा मागविला आहे. तसेच इतर तक्रारीच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्याबाबत प्रशासकीय विभाग म्हणून उच्च व तंत्रशिक्षण विभागास कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सामाजिक न्याय विभाग जात पडताळणी केंद्राकडे वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर करुनही प्रमाणपत्र मिळाले नसल्याबाबत**

**(१८) १३९९८ (१०-०४-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ येथील उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या जात प्रमाणपत्राच्या आधारे

अभियांत्रिकी, वैद्यकीय विद्यार्थी यांना प्रवेश निश्चित केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सामाजिक न्याय विभाग जात पडताळणी केंद्राकडे वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केला असूनही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, तंत्रशिक्षण संचालयाचे संचालक यांनी प्रमाणपत्रे सादर न केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात यावे असा आदेश जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. राजकुमार बडोले (२३-०९-२०१५) :** (१) अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेश निश्चित करण्यात आला, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

प्राप्त झालेल्या अर्जांपैकी बहुतांश अर्जदारांना जातवैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले असून उर्वरित अर्जदारांना SMS द्वारे जातवैधता प्रमाणपत्र घेवून जाण्याबाबत व काही अर्जदारांना त्रुटींची पूर्तता करण्याबाबत कळविले आहे. केवळ त्रुटीपूर्ततेअभावीची प्रकरणे प्रलंबित आहेत.

तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित झालेल्या मागास विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली होती.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यात अनुसूचित जातीमधील**
**मुले - मुलीसाठी शासकीय वसतिगृह नसल्याबाबत**

**(१९) १४०९० (१०-०४-२०१५). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यात अनुसूचित जातीमधील मुले - मुलीसाठी शासनाच्या स्वतःच्या जागेवर शासकीय वसतिगृह नसल्याने मा. लोकप्रतिनिधी यांनी सामाजिक न्याय विभागाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे तसेच हे वसतिगृह शासनाच्या जागेमध्ये किती कालावधी मध्ये होणे अपेक्षित आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०७-२०१५) :** (१) मिरज तालुक्यात ३ शासकीय वसतिगृहे असून त्यापैकी मिरज येथील गुणवंत मुलांचे वसतिगृह भाड्याच्या इमारतीत सुरु आहे.
(२) सदर शासकीय वसतीगृहासाठी शासकीय जमीन उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जातवैधता प्रमाणपत्रांसाठी अनुसूचित जातीवर्गाच्या नागरिकांना १९५० पूर्वीचा पुरावा द्यावा लागत असल्याबाबत**

**(२०) १५६१६ (०९-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जातवैधता प्रमाणपत्रांसाठी अनुसूचित जातीवर्गाच्या नागरिकांना १९५० पूर्वीचा पुरावा द्यावा लागत असल्याने त्यावेळी नागपूर मध्यप्रांताचा भाग असल्याने या अर्जकर्त्यांना अत्यंत त्रास होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी शासनाने नागपुरमधील अर्जकर्त्यांना खास बाब म्हणून कोणत्या सवलती देण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही.

जातपडताळणी नियम-२०१२ व केंद्र शासनाच्या निर्देशानुसार या विभागाच्या दि.६/२/२०१० च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती या प्रवर्गातील व्यक्तींना अथवा त्यांच्या कुटुंबियांना, दि.१०/८/१९५० रोजी वा तत्पूर्वी राज्यातील सर्वसाधारण रहिवासी असण्याची अट विहित करण्यात आली आहे, जातपडताळणी नियम २०१२ नुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यास जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यास कोणतीही अडचण उद्भवत नाही.

(२) नागपूरमधील जातपडताळणीकरिता अर्जकर्त्यांना कोणत्याही खास सवलती देण्यात येत नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अण्णाभाऊ साठे महामंडळाने कर्ज वितरण करतांना गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२१) १६००७ (१०-०४-२०१५). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अण्णाभाऊ साठे महामंडळाने कर्ज वितरण करतांना ५५ कोटी रूपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे कर्ज वाटप करतांना सर्व नियमांची पायमल्ली केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय वा त्यात काय आढळून आले, तसेच दोषी संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०७-२०१५) :** (१), (२), (३) व (४) महामंडळाच्या कर्ज वितरणाबाबत सीआयडीमार्फत चौकशी सुरु असून अद्याप चौकशी पूर्ण झालेली नाही. महामंडळाकडून

उपलब्ध माहिती नुसार महामंडळाच्या ज्या कार्यालयामार्फत कर्ज निधी रोखीने काढल्याचे निदर्शनास आले आहे अशा सर्व जिल्हा व्यवस्थापक व संबंधित धनादेशावर जिल्हा व्यवस्थापक सोबत स्वाक्षरी करणा-या कर्मचा-यांना निलंबित करण्यात आले असून तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री.एस.के.बावणे यांना शासनाचे आदेश क्रमांक एलएएस २०१४/प्र.क्र.४१६/महामंडळे दिनांक १८.४.२०१५ अन्वये निलंबित करण्यात येऊन चौकशी सुरु आहे.

---

**जात पडताळणी कार्यालयात राजपूत भामटाच्या जातीची**
**प्रकरणे प्रलंबित ठेवण्यात आल्याबाबत**

**(२२) १६११७ (०९-०४-२०१५). श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी, औरंगाबाद व लातूर येथिल जातपडताळणी कार्यालयात राजपूत भामटाच्या जातीचे विद्यार्थी व शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची सुमारे ५० हजार प्रकरणे विना निर्णय प्रलंबित ठेवण्यात आले असल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यालयामध्ये संबंधित जातपडताळणी अधिकारी व दलाल यांचे संगनमत असल्यामुळे प्रकरण निकाली काढण्यासाठी पैश्याची मागणी केली जाते, आर्थिक व्यवहार न केल्यास सन १९६१ च्या महसूली पुराव्याची मागणी केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन १९६१ चे महसूली पुरावे देता न आल्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तसेच अधिकारी/कर्मचारी यांना सोईसुविधा मिळण्यापासून वंचित राहावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व चौकशीअंती सन १९६१ च्या महसुली पुराव्याची अट रद्द करुन त्याऐवजी शाळा सोडल्याचा दाखला (टी.सी) व प्रवेश निर्गम उतारा ग्राहय धरण्याबाबत तसेच संबंधित अधिकारी व दलाल यांचे विरुध्द कारवाई करुन प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्याबाबत शासनाने कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-०७-२०१५) :** (१), (२) व (३) नाही. हे खरे नाही.

(४) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार या विभागाच्या दि.६/२/२०१० च्या शासन निर्णयान्वये विमुक्त जाती भटक्या जमाती या प्रवर्गातील व्यक्तींना अथवा त्यांच्या कुटुंबियांना दि.२१/११/१९६१ रोजी वा तत्पूर्वी त्यांचा राज्यातील सर्वसाधारण रहिवास असण्याची अट विहित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेरोजगारांना स्वयंरोजगाराकडे वळविण्यासाठी सोलापूर येथील जिल्हा उद्योग केंद्रातून प्रस्तावांना कर्ज मंजूरी देण्याबाबत**

**(२३) १६५५६ (१०-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेरोजगारांना स्वयंरोजगाराकडे वळविण्यासाठी सोलापूर येथील जिल्हा उद्योग केंद्रातून ९८ प्रस्ताव संबंधित बँकाकडे पाठविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी फक्त ४५ प्रस्तावांना कर्ज मंजूरी देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित ५३ प्रस्तावांना कर्ज मंजूरी न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०९-२०१५) :**(१) होय,

(२) होय,

(३) उर्वरित ५३ प्रस्तावांना बँकेकडून कर्ज प्रकरणे मंजूर न होण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

१. अर्जदार कागदपत्रांची पूर्तता न करणे
२. बँकेच्या कार्यक्षेत्रात येत नसणे
३. सदर व्यवसायास वाव नसणे
४. अर्जदार कर्ज घेणेस इच्छुक नसणे
५. अनुभवाची कमतरता/पुर्वानुभव समाधानकारक नसणे
६. व्यवसाय तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या किफायतशीर नसणे

---

**राज्यातील उद्योगांना ७५ परवानग्या द्याव्या लागत असल्याबाबत**

**(२४) १६५७१ (०६-०८-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उद्योगांना ७५ परवान्या घ्यावा लागत असल्याने अनेक उद्योग इतर राज्यात जात असल्याने उद्योगांना लागणा-या परवानग्या २२ इतक्या कमी केल्या असून आणखी कमी करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे अशी घोषणा मा.मुख्यमंत्री व मा.उद्योग मंत्री महोदयांनी

केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात याबाबतचा कोणताही आदेश अद्याप शासनाने काढलेला नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने धोरणात्मक निर्णय घेवून उद्योगासाठी लागणाऱ्या परवानग्या विनाविलंब मिळाव्यात यासाठी प्रत्येक जिल्हयात एक खिडकी योजनेखाली उद्योजकांना १५ दिवसांत परवाने दिले जातील असे माहे मे २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१४-०९-२०१५) :**(१) "मेक इन महाराष्ट्र" या उपक्रमांतर्गत उद्योगांसाठी लागणा-या कंपन्यांची संख्या कमी न करता राज्यातील उद्योगांना लागणारे विविध परवाने / संमती यांची संख्या व त्यासाठी लागणारा कालावधी कमी करण्यात येत आहे.

राज्यात उद्योग स्थापन करण्याच्या प्रक्रियेमध्ये घटकाची गुंतवणूक, उत्पादन प्रक्रिया, उद्योगाचे ठिकाण इत्यादीच्या आधारे ढोबळमानाने एमआयडीसी क्षेत्रात ६४ तर एमआयडीसी क्षेत्राबाहेर ६६ परवाने लागत असत, आता सुलभिकरणाअंतर्गत त्याची संख्या ही अनुक्रमे ४६ ते ४८ परवाने इतकी करण्यात आली असून ऑटो उद्योगांना एमआयडीसी क्षेत्रात ३७ व एमआयडीसी क्षेत्राबाहेरील जागेवर ४२ परवाने लागत आहेत तसेच स्टील उद्योगांनाही अनुक्रमे ४१ व ४६ परवाने लागत आहेत म्हणजेच पूर्वी लागणा-या परवानग्यांची संख्या शासनातर्फे कमी करण्यात आली आहे.
(२) या संदर्भात आदेश संबंधित प्रशासकीय विभागाने काढलेले आहे. काही प्रकरणी कायद्यात सुधारणा करुन त्यात दुरुस्ती करण्यात आल्या आहेत.
(३) शासन निर्णय दि.२८/०७/२०१५ अन्वये राज्यातील सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या गुंतवणूकदारांसाठी सर्वसाधारणपणे आवश्यक असलेले परवाने, ना-हरकती व संमत्या सुलभतेने व जलदगतीने प्राप्त करुन देण्यासाठी महसूल विभाग स्तरावर मैत्री कक्षाची स्थापन करण्यात आली आहे. एक खिडकी योजनेबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चांदुर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गत संगायो समिती गठीत नसल्याबाबत**

**(२५) १६९७५ (३०-०७-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदुर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गत संगायो समिती गठीत नसल्यामुळे विशेष सहाय्य कार्यक्रमातील विविध योजनांतर्गत लाभार्थ्यांचे अर्ज संबंधित

तहसिलदार यांनी मंजूर करण्याच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही होण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तहसिलदार, चांदूर रेल्वे, अमरावती यांना दि. २२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय?
(२) असल्यास, शासनाने सदर निवेदनावर चौकशी केली आली आहे काय व चौकशीअंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. राजकुमार बडोले (२३-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
मा.विधानसभा सदस्य यांनी उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे यांना दि.२२.०५.२०१५ रोजी निवेदन दिले आहे.
(२) सदर निवेदनानुसार संजय गांधी निराधार अनुदान योजनेची व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेची पात्र प्रकरणे मंजुर करण्यात आलेली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे येथील कोलबाड परिसरातील सिध्दीविनायक इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ महानगर गॅसच्या वायुवाहिनीचा स्फोट झाल्याबाबत**

**(२६) १७३४१ (१०-०८-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील कोलबाड परिसरातील सिध्दीविनायक इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ महानगर गॅसच्या वायुवाहिनीचा स्फोट होवून झालेल्या अपघातात चार कामगार जखमी झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०४-०९-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
महानगर गॅस लि. कंपनीला कुठलीही पूर्वकल्पना न देता कोलबाड परिसराजवळ मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम कंपनीचे HDD (Horrizontal Directional Drilling) चे काम सुरु असताना नैसर्गिक वायू पुरवठा करणाऱ्या पाईपलाईनला हानी झाली. त्याच्या दुरुस्तीचे काम सुरु असताना आग लागल्याने दोन कामगार जखमी झाले होते.
(२) व (३) सदर प्रकरणी एमजीएल कंपनीने चौकशी करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल केंद्र शासनाच्या पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाला सादर केलेला आहे.

---

**एल ॲण्ड टी इन्फ्रा कंपनीने राज्यातील प्रकल्प अन्य राज्यात स्थलांतरित करण्याच्या निर्णयाबाबत**

**(२७) १८१०४ (०६-०८-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पायाभूत सुविधा पुरविण्यात नावाजलेली एल ॲण्ड टी इन्फ्रा कंपनीने राज्यातील प्रकल्प अन्य राज्यात स्थलांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त कंपनीचे प्रकल्प राज्यातच रहावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१४-०९-२०१५) :** (१) एल ॲण्ड टी इन्फ्रा कंपनी अन्य राज्यात स्थलांतरीत होत असल्याबाबतचे कोणतेही निवेदन/प्रस्ताव विभागास प्राप्त झालेले नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयात जिल्हा उद्योग केंद्राकडून सुशिक्षित बेरोजगाराची कर्ज प्रकरणेबाबत**

**(२८) १८१८० (१०-०८-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात जिल्हा उद्योग केंद्राकडून सुशिक्षित बेरोजगाराची कर्ज प्रकरणे मंजूर होऊन बँकेकडे येऊनही बँकेमार्फत कर्ज वाटप होत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सुशिक्षित बेरोजगारांची उपासमार होऊ नये म्हणून शासनाने कोणती

कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.
नांदेड जिल्ह्यासाठी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पित निधीपैकी सुधारित बीज भांडवल योजनेअंतर्गत कर्ज वितरणाचे प्रमाण ९५.५०% व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजने अंतर्गत कर्ज वितरणाचे प्रमाण ९९.६०% इतके आहे.
(२) जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांनी बीज भांडवलाची रक्कम अदा केलेल्या सर्व प्रकरणात बँकेने कर्ज वाटप केलेले आहे त्यामुळे चौकशीचा व कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरोळ तालुक्यात (जि.कोल्हापूर) श्रावणबाळ योजना व संजय गांधी निराधार शासकीय योजनेच्या अंमलबजावणीबाबत

**(२९) १९६७६ (३०-०७-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रावणबाळ योजना व संजय गांधी निराधार शासकीय योजनेंची शिरोळ तालुक्यात (जि.कोल्हापूर) अंमलबजावणी तसेच शिरोळ तालुका शेतमजूर श्रमिक संघटना यांच्या विविध मागण्यांबाबतचे निवेदन दिनांक ३ एप्रिल, २०१५ रोजीच्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी तहसिलदार, शिरोळ, जि.कोल्हापूर यांच्याकडे दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनातील मागण्यांचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, या मागण्यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यांचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
कार्याध्यक्ष, शिरोळ तालुका शेतमजूर श्रमिक संघटना, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी दि.३.०४.२०१५ रोजी तहसिलदार, शिरोळ यांना निवेदन दिले आहे.
(२) संबंधित तलाठ्यांकडे सादर केलेल्या कागदपत्रांची सद्यःस्थिती, लाभधारकांच्या बँक खात्यातून बँकेमार्फत केली जाणारी कपात, अर्जदारांची मंजुरी/नामंजुरी यादी देणे आणि तलाठी, कोतवाल व संघटनेचे पदाधिकारी यांची बैठक आयोजित करणे या मागण्या प्रस्तुतच्या निवेदनान्वये केल्या आहेत.
(३) दि.२६.०३.२०१५ व दि.२९.०४.२०१५ रोजी संजय गांधी योजना समितीची बैठक आयोजित करुन पात्र लाभार्थ्यांना अनुक्रमे एप्रिल, २०१५ व मे, २०१५ पासून लाभ देण्यात येत असून पात्र व अपात्र अर्जदारांची यादी वरील संघटनेच्या अध्यक्षांना दिली आहे. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कोअर बँकींग प्रणालीच्या सुविधेकरिता रु.१२ इतके सेवाशुल्क आकारले जाते. त्यास अनुसरुन विशेष सहाय्य योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मिळत असलेल्या

लाभामधून सदरचे सेवाशुल्क आकारु नये असे उपरोक्त बँकेस दि.०३.०७.२०१५ रोजी कळविले आहे. त्याचप्रमाणे विशेष सहाय्य योजनेअंतर्गत प्राप्त होणा-या अर्जांची तात्काळ छाननी करुन मंजुरीकरिता तहसिल कार्यालयास सादर करण्याबाबत तलाठी व मंडळ अधिकारी यांना सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात गुंतवणूक वाढविण्याबाबत**

**(३०) १९७२७ (३१-०७-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.मनोहर भोईर (उरण), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चीन दौ-यात बिजिंग येथे राज्यात गुंतवणूक वाढविण्यासंदर्भात विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यासमवेत मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास बैठका घेतल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्या कंपन्याबरोबर कोणत्या उत्पादनांबाबत या बैठकात चर्चा झाली आहे,

(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-०९-२०१५) :** (१) होय.

राज्यात विविध उद्योग उभारणीसाठी परदेशी गुंतवणूक व्हावी या उद्देशाने मा.मुख्यमंत्री यांनी दि.१४ ते १८ मे, २०१५ या दरम्यान चीनचा दौरा केला होता.

(२) सदर दौऱ्यादरम्यान राज्य शासनाने गुंतवणूकदारांना दिलेले देकारपत्र त्यांच्याशी केलेल्या सामंजस्य कराराबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) मे.हाय्यर, चीन यांच्या रांजणगांव, पुणे येथील इलेक्ट्रीक उत्पादनाच्या उद्योगाला विशाल प्रकल्पाचा दर्जा देण्यात आला असून याबाबतचे देकारपत्र मे.हाय्यर कंपनीला चिंगडाऊ, चीन येथे राज्य शासनामार्फत देण्यात आले.

२) फॉक्सकॉन टेक्नॉलॉजी समुहाशी मोबाईल उत्पादन उद्योगासंदर्भात राज्य शासनाने सामंजस्य करार केला आहे.

३) तसेच महाराष्ट्रातील औरंगाबाद व चीन मधील डुंग हॉंग या दोन शहरात भगिनी शहर (Sister city) बाबत सामंजस्य करार करण्यात आला.

(३) विकास आयुक्त (उद्योग) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व शासनाच्या उद्योग विभागाकडून सदर देकारपत्र/सामंजस्य करार यांचा लाभ मिळविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उद्योग क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी महाराष्ट्र**
**एमएसएमई विकास संस्था स्थापन करण्याबाबत**

**(३१) १९७५६ (३१-०७-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उद्योग क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी स्वतंत्र, सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी महाराष्ट्र एमएसएमई विकास संस्था स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा मा. मुख्यमंत्री यांनी माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संस्थेमार्फत कोणत्या योजना राबविण्यात येणार आहे, व संस्थेचे काम किती कालावधीत सुरु करण्याचे शासनास अपेक्षित आहे, तसेच उद्योग क्षेत्रात कोणते परिवर्तन होणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०९-२०१५) :** (१) होय.
(२) केंद्र शासनाच्या धर्तीवर सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास संस्था स्थापन करावयाचे नियोजित असून सदरहू संस्थेची उद्दीष्टे व ध्येय काय असावेत या संदर्भात संबंधित संस्था जसे उद्योजकता विकास संस्था, अहमदाबाद, केंद्र शासनाचे सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास संस्था, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र इत्यादी बरोबर चर्चा सुरु आहे. संबंधिताबरोबरील चर्चेअंती राज्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमाच्या विकासासाठी कोणत्या योजना राबविता येतील, याविषयी निश्चित आराखडा तयार करण्यात येईल. सद्यस्थितीत या क्षेत्रातील विविध घटकांबरोबर चर्चा चालू आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेचा सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम हे महत्त्वाचा कणा असल्यामुळे सदरील संस्था स्थापन झाल्यानंतर सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमाचा विकास होईल व त्यांची स्पर्धात्मकता वाढून राज्यातील बेरोजगारांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या अतिरिक्त संधी निर्माण होतील.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**संजय गाधी निराधार योजनेअंतर्गत झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(३२) २०१२४ (३०-०७-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे धारणी (जि.अमरावती) येथे संजय गांधी निराधार योजनेच्या शेकडो बोगस लाभार्थीना आर्थिक लाभ देणा-या नायब तहसिलदार श्री.पी.पी.सोळके यांचे विरुध्द पोलीस गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बोगस लोकांना पात्र दाखवून शासनानचे लाखो रुपयांचे नुकसान संबंधित नायब तहसिलदार व कर्मचारी यांनी गैरव्यवहार करून केला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाची फसवणूक व गैरव्यवहार करणा-या नायब तहसिलदार व कर्मचारी

यांचेकडून वितरीत केलेली रक्कम वसुल करणेबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. राजकुमार बडोले (२३-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) श्री.पी.पी.सोळके, नायब तहसिलदार यांचे विरुध्द पोलीस स्टेशन धारणी, जि.अमरावती येथे भारतीय दंड विधान नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच, त्यांना निलंबित करुन विभागीय चौकशी सुरु केली आहे. त्याचप्रमाणे श्री.फरकुंडे, अव्वल कारकून, श्री.तोडेवाड, कनिष्ठ लिपीक व कु.ठेंग, कनिष्ठ लिपिक यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी विभागीय चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषी असल्याचे आढळून आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचेकडून योग्य ती वसुलीची कार्यवाही तात्काळ करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३३) २०७६८ (३०-०७-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर) श्री.हेमंत पाटील (नांदेळ दक्षिण), श्री.सुभाष साबणे (देगलूर), लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील १० वर्षात मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये सुमारे ५५ हजार कोटींचा गैरव्यवहार झाल्याचे सामाजिक न्याय मंत्री यांनी मिरज (सांगली) येथे दिनांक ३० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास मान्य केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नांदेड जिल्ह्यातील मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचे सुमारे ९ कोटी रुपये सामाजिक न्याय विभागाकडे थकित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची सीबीआय चौकशी सुरु केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व संबंधित दोषींवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०९-२०१५) :** (१) समाजकल्याण विभागातंर्गत झालेल्या ५५ हजार कोटी रुपयांच्या अपहाराची केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडून चौकशी करण्यात येईल अशी माहिती मिरज येथे मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांनी दिली असल्याची बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली आहे.
(२) नाही.
(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित असल्याबाबत**

**(३४) २१२७२ (३०-०७-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १६ लाख १ हजार २८९ विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ऑनलाईन नोंदणी झाली असून राज्यभरातील विविध विभागातील जिल्हा पातळीवर ३ लाख ३३९ अर्ज प्रलंबित आहे तर महाविद्यालयीन स्तरावर ६ लाख ५९ हजार ७४९ अर्ज प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याचप्रमाणे ५ हजार ३८७ विद्यार्थ्यांचे अर्ज नाकारले आहेत तर ६ लाख ३५ हजार ८०४ अर्जच मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वर्ष संपत आले असतानाही विद्यार्थी अद्यापही शिष्यवृत्तीच्या प्रतीक्षेतच आहे, हे खरे आहे काय तसेच सदर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित ठेवण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-०९-२०१५) :** (१) व (२) सन २०१४-१५ मध्ये एकूण १६,६७,३८२ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ११,०३,६५२ इतके अर्ज निकाली काढले असून ५,६३,७३० अर्ज प्रलंबित होते.
(३) अंशतः खरे आहे.
(४) प्रलंबित असलेले अर्ज छाननीसाठी महाविद्यालय स्तरावर तसेच जिल्ह्याच्या सहायक आयुक्त स्तरावर प्रलंबित आहेत. सदर प्रलंबित असलेले अर्ज सन २०१५-१६ मध्ये प्राधान्याने निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील एम.एस्सी.कॉम्प्युटर विद्यार्थ्यांना**
**शिष्यवृत्तीचा लाभ मिळत नसल्याबाबत**

**(३५) २१६६७ (३०-०७-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांना सन २०११-१२ पासून देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचे अर्ज ई शिष्यवृत्ती प्रणाली मार्फत भरण्याची सुविधा निर्माण करण्यात आली असून सन २०११-१२ ते

सन २०१३-२०१४ पर्यंत या अभ्यासक्रम प्रवेशीत विद्यार्थ्यांना संगणक प्रणालितील आर्थिक अडचणीमुळे या शिष्यवृत्तीचा लाभ घेता येत नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे का,
(२) असल्यास, खामगांव (जि.बुलढाणा) येथे गो.से. महाविद्यालयातील अभ्यासक्रमाचे ३२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन संगणक प्रणालीतील ही तांत्रीक अडचण दूर करुन सदर विद्यार्थ्यांस शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०९-२०१५) :** (१) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठीच्या सद्या सुरु असलेल्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेत एस.एस्सी.कॉम्प्युटरसह इतर काही अभ्यासक्रमांचा समावेश नाही. त्यामुळे सदर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमासाठीच्या शिष्यवृत्तीचा लाभ दिला जात नाही.
(२) इतर मागासवर्गीय मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतंर्गत एम.एस्सी कॉम्प्युटर अभ्यासक्रमास शिष्यवृत्ती देय नसल्याने खामगांव (बुलढाणा) येथील गो.से. महाविद्यालयातील या अभ्यासक्रमात शिकणा-या ३२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आलेली नाही.
(३) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतंर्गत एस.एस्सी. कॉम्प्युटर व इतर सुधारित अभ्यासक्रमांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### केंद्र शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान रोजगार निर्मिती योजनेबाबत

**(३६) २१९८६ (१०-०८-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुशिक्षित बेरोजगारी कमी करण्यासाठी केंद्र शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान रोजगार निर्मिती योजनेतील डिपॉझिट देण्याची पात्रता अशा जाचक अटीमुळे या योजनेचा लाभापासून सुशिक्षित बेरोजगार वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जाचक अटी कोणत्या व त्या दूर करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही. केंद्र शासन पुरस्कृत “पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम” या योजनेअंतर्गत डिपॉझिट घेण्याची तरतूद नाही. त्यामुळे या योजनेच्या लाभापासून सुशिक्षित बेरोजगार वंचित राहत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात कच्च्या मालाचा अपुरा पुरवठा होत असल्याबाबत**

**(३७) २१९९८ (३१-०७-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील कोल्हापूरी चप्पल उद्योग कच्चा मालाच्या अपुरा पुरवठामुळे आणि सतत वाढत असलेले चामडयांचे दरांमुळे नामशेष होत असल्याने ३५ ते ४० हजार कारागीर आर्थिकदृष्टया अडचणीत आले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०९-२०१५) :** (१) याबाबत, उद्योग संचालनालय, मुंबई तसेच जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर या कार्यालयाकडे कोल्हापूरी चप्पल औद्योगिक संघटना अथवा इतर औद्योगिक समूह यांचेकडून कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात श्रावणबाळ व संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या उत्पन्नाच्या मर्यादेत वाढ करण्याबबात**

**(३८) २२४२२ (०६-०८-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध निराधार योजनेअंतर्गत निराधारांना निर्वाहासाठी अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्रावणबाळ व संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या लाभार्थ्यांसाठी रु.२१ हजार पेक्षा कमी उत्पन्न असण्याची जाचक अट असून वाढत चाललेला रोजगार व वाढती महागाई याचा विचार करता सदर उत्पनाच्या मर्यादेत वाढ करण्याबाबत लोक प्रतिनिधींकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, उक्त योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड करताना त्यांच्या अपत्याचे वय २५ वर्षापेक्षा जास्त असल्यास त्यांना अनुदान देण्यात येत नाही अशी अट आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अपत्य व्यसनाधीन, बेरोजगार इत्यादी कारणांमुळे अनेक वृध्द आई-वडिलांचा अपत्याकडून सांभाळ केला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या योजनेत वृध्द आई-वडिलांचा सांभाळ होण्याच्या दृष्टीने व त्यांना मानधन मिळण्यासाठी ही जाचक अट शिथिल करणेबाबत लोक प्रतिनिधींकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, भाग १,२,३,४,५ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय. लाभार्थ्यांच्या वार्षिक उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याबाबत मागणी होत आहे, हे खरे आहे.
(३), (४), (५) व (६) संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत लाभ घेणा-या लाभार्थ्यांच्या मुलाचे वय २१ वर्ष झाल्यानंतर अशा लाभार्थ्यांचा लाभ बंद करावा अशी तरतूद दि.३०.०९.२००८ रोजीच्या शासन निर्णयात होती. परंतु, दि.२६ ऑक्टोबर, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर वयोमर्यादेत वाढ करुन ही वयोमर्यादा २५ इतकी करण्यात आली आहे, तसेच मुलाला नोकरी मिळाल्यानंतर (शासकीय/निमशासकीय/खाजगी) मुलाचे व कुटुंबाचे उत्पन्न विचारात घेऊन अशा लाभार्थ्याची पात्रता/अपात्रता ठरविण्यात यावी असे विहीत केले आहे. त्याचबरोबर, ज्या लाभार्थ्यांना फक्त मुलीच असतील, अशा लाभार्थ्यांच्या बाबतीत मुलीचे वय २५ वर्ष झाले अथवा त्यांना नोकरी लागली किंवा त्यांचे लग्न होऊन नांदावयास गेल्या तरीसुध्दा अशा लाभार्थ्यांचा लाभ चालूच ठेवण्यात येतो.

तसेच दि.१२.०६.२०१३ रोजीच्या परिपत्रकानुसार श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना गट अ व गट ब मध्ये लाभार्थ्यांना जरी मुले असली तरीसुध्दा अशा लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो. त्याचप्रमाणे लाभार्थ्यांच्या वार्षिक उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी विद्यार्थ्यांना कन्यादान योजनेचे अनुदान अद्याप मिळाले नसल्याबाबत

**(३९) २२९३३ (३१-०७-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व वेदांत फाऊंडेशन मुंबई या संस्थेच्या सहकार्याने जव्हार तालुक्यातील (जि.पालघर) धनोशी व मोखाडा तालुक्यातील आसे गावातील ३०२ आदिवासी जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळा सन २०१४ मध्ये वा त्यादरम्यान पार पडला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व कागदपत्रांची पुर्तता करुनही आदिवासी लाभार्थ्यांना एक वर्ष उलटूनही कन्यादान योजनेचे अनुदान अद्याप मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय?
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय

आढळून आले तसेच चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थींना अनुदान मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा (२३-०९-२०१५) :** (१) होय, एकूण २८३ जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळा दि.१९/०५/२०१४ रोजी पार पाडला आहे.
(२) हे खरे नाही.

प्राप्त कागदपत्रांची तपासणी करुन कन्यादान योजनेअंतर्गत ९६ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.
(३) कन्यादान योजनेअंतर्गत उर्वरित जोडप्यांना लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत वस्त्रोद्योग घटकांना देण्यात येणारे व्याज अनुदान स्थगित करण्याबाबत**

**(४०) २३२०८ (१९-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत वस्त्रोद्योग घटकांना देण्यात येणारे व्याज अनुदान स्थगित करण्याचे आदेश उद्योग उर्जा व कामगार विभागाने दिनांक १२ मे, २०१४ च्या आदेशानुसार दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशामुळे वस्त्रोद्योग घटकांना मिळणारे अनुदान बंद होणार असून राज्यातील छोटे वस्त्रोद्योजक अडचणीत येणार असल्याने हा निर्णय मागे घेण्याची मागणी राज्यभरातील विविध वस्त्रोद्योग संघटनांनी मा.उद्योगमंत्री यांच्याकडे माहे मे २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर व्याज अनुदान स्थिगीत करण्याची सर्वसाधारण कारणे कोणती व विविध संघटनांच्या मागण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-०९-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) १. राज्याच्या वस्त्रोद्योग धोरणांतर्गत वस्त्रोद्योग घटकांना अनुज्ञेय व्याज अनुदानाची गणना करताना त्यामधून राज्याच्या उद्योग धोरणंतर्गत संबंधित वस्त्रोद्योग घटकास मिळणारे व्याज अनुदान वजा केले जाते. राज्याच्या वस्त्रोद्योग धोरणांतर्गत वस्त्रोद्योग घटकांना त्रैमासिक व्याज अनुदान दिले जाते. त्यासाठी संचालक (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र शासन यांना संबंधित वस्त्रोद्योग घटकांच्या बाबतीत प्रत्येक तिमाहीला जिल्हा उद्योग केंद्रांकडून प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे लागते. मात्र जिल्हा उद्योग केंद्रांकडून संचालक, (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र शासन यांना असे त्रैमासिक प्रमाणपत्र पाठविण्यास बराच

विलंब केला जातो. त्यामुळे पात्र वस्त्रोद्योग घटकांना वस्त्रोद्योग धोरणांतर्गत त्रैमासिक व्याज अनुदान वितरीत करण्यास विलंब होतो.

२. राज्य वस्त्रोद्योग धोरणांतर्गत व्याज अनुदानासाठी प्रकल्प किंमतीची कोणतीही मर्यादा नाही. म्हणजेच वस्त्रोद्योग धोरणांतर्गत सूक्ष्म, लघु, मध्यम, विशाल व अतिविशाल असे सर्वच प्रकारचे वस्त्रोद्योग घटक अनुदानासाठी पात्र आहेत. त्यामुळे राज्याच्या उद्योग धोरणांतर्गत सूक्ष्म, लघु, मध्यम वस्त्रोद्योग घटकांना व्याज अनुदान दिले नाही तर वस्त्रोद्योग घटकांना उद्योग विभागाकडून व्याज अनुदान मिळाले किंवा कसे याबाबत जिल्हा उद्योग केंद्रांकडून संचालक (वस्त्रोद्योग) यांना त्रैमासिक प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची गरज राहणार नाही व व्याज अनुदानाचे दावे जलदगतीने निकाली काढण्यास मदत होईल असा प्रस्ताव वस्त्रोद्योग विभागाने उद्योग विभागास सादर केला होता. त्यानुषंगाने वरील निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या वतीने बेरोजगार तरुणांना**
**भाजी-पाला वाहतूकीचा रोजगार मिळवून देण्याबाबत**

**(४१) २३२२२ (३०-०७-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीय बेरोजगार तरुणांना भाजीपाला वाहतुकीचा रोजगार मिळवून देण्याच्या नावाखाली लोकशहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या वतीने २०१३ मध्ये तब्बल १०० गाडया कोट्यवधी रुपये खर्च करुन खरेदी करण्यात आल्या असून त्या अद्यापही वाटपाविना संबंधित कंपन्यांच्या आवारात पडून असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही वाहने लाभार्थ्यांना वितरीत करण्यापूर्वीच महामंडळाने कोट्यवधी रुपयांचा खर्च केला असून अद्याप पार्किंग, डिझाईनिंग या पोटी कोट्यवधी रुपये देणे बाकी आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गाड्या खरेदीकरीता रु. ६ कोटी मंजुर असता रु. ७.८८ कोटीची खरेदी अधिका-यांकडून अवैद्यरित्या करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

तसेच २ वर्षात गंजलेल्या वाहनांचे पार्कींग आकार ४१ वाहनांचा डिझायनिंगचा खर्च व विमा नुतणीकरणासाठी १ कोटी ५४ हजार रु. ची आवश्यकता असल्याचे अहवालात म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०९-२०१५) :** (१) होय, खरे आहे.
(२) व (३) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळामार्फत भाजीपाला विक्रीसाठी उपयुक्त १०० वाहनांची खरेदी करण्यात आली असून सदर वाहनांचे वितरण लाभार्थींना अद्याप करण्यात आलेले नाही. यासाठी मंजूर कर्ज प्रकल्प मर्यादा रु.६.०० कोटी आहे व महामंडळाने आतापर्यंत रु.६.८३ कोटी खर्च केलेला आहे. सध्या वाहनाचे विम्याचे नुतनीकरण करणे क्रमप्राप्त आहे. पार्किंगच्या खर्चाची मागणी संबंधित वितरकाकडून करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे वरील खर्चाव्यतिरिक्त रु.१.०५ कोटी खर्च अपेक्षित आहे.
(४) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या सन २०१२-१३ ते २०१४-१५ या कालावधीतील सर्व कामकाजाची चौकशी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**संजय गांधी निराधार योजना कार्यान्वित करण्यासाठी**
**समितीची स्थापना न करण्यात आल्याबाबत**

**(४२) २३६८२ (३०-०७-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंध, अपंग, विधवा तसेच निराधार यांना दिलासा देणारी संजय गांधी निराधार योजना कार्यान्वित करण्यासाठी समितीची स्थापना गेल्या सहा महिन्यापासून करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे लाभार्थ्यांना आर्थिक अडचणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त समितीची स्थापना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०९-२०१५) :** (१), (२) व (३) सर्वसाधारण परिस्थितीमध्ये संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या अध्यक्षांची व अशासकीय सदस्यांच्या नावांची शिफारस संबंधित जिल्हयाचे मा.पालकमंत्री महोदय यांनी जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडून समिती गठनाचे आदेश निर्गमित केले जातात. परंतु ज्या तालुक्यामध्ये नियमित संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती गठीत झाली नसेल, त्यावेळी अशा तालुक्यांमध्ये विशेष सहाय्यक कार्यक्रमातील विविध योजनांतर्गत लाभार्थ्यांचे प्राप्त झालेले अर्ज मंजूर करण्याचे अधिकार संबंधित तहसिलदार/नायब तहसिलदार यांना प्रदान केले आहेत. सदर सर्व अर्ज निकषांच्या अधीनतेने एका महिन्याच्या कालावधीत निकाली काढण्याचे निर्देश दिले आहेत तसेच सर्व जिल्हयांच्या मा.पालकमंत्री महोदयांना संजय गांधी योजना समितीच्या अध्यक्षांची व अशासकीय सदस्यांच्या नावाची शिफारस जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्याकरिता दि.०६.०४.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील शिरोळ व हातकणंगले तालुक्यातील वृध्दपकाळ निराधार योजना सारख्या अन्य योजनांपासून लाभार्थी वंचित असल्याबाबत**

**(४३) २४४११ (३०-०७-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील शिरोळ व हातकणंगले या दोन तालुक्यात वृध्दपकाळ निराधार योजना सारख्या योजना बंद असून अनेक लाभार्थी वेद्यकियअधिकारी यांच्याकडून दाखला न मिळाल्याने या योजनापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरीब लाभार्थ्यांना तालुक्याच्या ठिकाणापर्यंत जाण्याची कुवत नसल्याने ते ग्रामीण रुग्णालयाचा दाखला आणतात तथापि त्यांची दखल घेतली जात नसल्याने हे लाभार्थी वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) शिरोळ तालुक्यांमध्ये संजय गांधी योजना समितीस ३९२ प्रकरणात वयामध्ये साशंकता आढळल्याने सदरची प्रकरणे जिल्हा वैद्यकीय मंडळाकडे फेरतपासणीकरिता पाठवावीत असे ठरले. त्यास अनुसरून शिरोळ तालुक्यात जिल्हा वैद्यकीय अधिकारी यांची शिबिरे आयोजित करुन अशा लाभार्थ्यांच्या वयाचे दाखले प्राप्त करुन घेऊन ही प्रकरणे समितीसमोर निर्णयार्थ ठेवण्यात आलेली आहेत. हातकणंगले तालुक्यात ग्रामीण रुग्णालयाचा दाखला ज्या लाभार्थ्यांनी सादर केला त्या सर्व पात्र लाभार्थ्यांची प्रकरणे मंजूर केली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील निराधारांकरिता योजनेंतर्गत देण्यात येत असलेल्या मासिक अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(४४) २४७२२ (३०-०७-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनामार्फत राज्यातील निराधारांकरिता वेगवेगळया योजनेंतर्गत देण्यात येत असलेल्या मासिक अनुदानात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) विशेष सहाय्य कार्यक्रमाअंतर्गतच्या योजनांमधील निवृत्तीवेतनामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केला असून त्याबाबतचा निर्णय अद्याप व्हावयाचा आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात स्टील उद्योगाला चालना देण्याबाबत**

**(४५) २५२२८ (३१-०७-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागपूर, जालना, नाशिक, पुणे या शहरात काही वर्षाआधी ६०० पेक्षा जास्त रोलिंग मिल व १० हजार व्यवसायिक होते तसेच गेल्या चार ते पाच वर्षात हे प्रमाण अर्ध्यावर आल्याचे दिनांक ८ जून, २०१५ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीजदरामधील फटका आणि कच्च्या मालाच्या स्त्रोतांचा अभाव, तसेच स्पर्धामुळे राज्यातील स्टील उद्योग संकटात आला असून हजारो कामागारांवर बेकार होण्याची वेळ येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र | जिल्हा | नोंदणीकृत मिल | बंद मिल |
|---|---|---|---|
| १. | नागपूर | ६६ | १२ |
| २. | जालना | ५६ | ०६ |
| ३. | नाशिक | ६५ | ०९ |
| ४. | पुणे | २६ | ०० |

(२) अंशतः खरे आहे.

१) नागपूर - येथील १२ रोलिंग मिल बंद असून त्यातील रोजगार १६९ आहे.

२) जालना - येथील ०६ रोलिंग मिल बंद असून त्यातील रोजगार २८६ आहे.

३) नाशिक - येथील ०९ रोलिंग मिल बंद असून त्यातील रोजगार ३५८ आहे.

४) पुणे - या जिल्ह्यामधील एकही रोलिंग मिल बंद नाही.

(३) व (४) मुल्यवर्धित कर परतावा, विद्युत टेरिफ परतावा, विद्युत शुल्क माफी, मुद्रांत शुल्क माफी, व्याज अनुदान यासारखे प्रोत्साहन लाभ देण्यात येतात. आजारी व बंद उद्योग घटकांचे पुनर्वसन करण्यात येते. महाराष्ट्र औद्योगिक धोरण - २०१३ नुसार पुनरुज्जीवन नसलेल्या तसेच बंद घटकासाठी विशेष अभय योजना सन २०१३ ते २०१५ या कालावधीत राबविण्यात आली. उद्योग घटकाने भरलेला मुल्यवर्धित कर तसेच कच्च्या मालावर भरावा

लागलेला मुल्यवर्धित कर औद्योगिक प्रोत्साहन अनुदान म्हणून देण्यांत येते. उद्योग घटकाने घेतलेल्या मुदत कर्जावर ५ टक्के व्याजाचा परतावा घटकास देण्यात येतो (वीजबिलाच्या प्रमाणात). उद्योग घटकास आकारल्या जाणा-या वीजदरावर रु.०.५० ते रु.१.०० प्रति युनिट पॉवर टेरिफ सबसिडी पहिल्या तीन वर्षासाठी दिली जाते. नविन उद्योग घटकांना त्यांच्या वीजबीलात आकारले जाणारे विद्युतशुल्क १५ वर्षासाठी माफ करण्यांत आले आहे. उपरोक्तप्रमाणे बंद व आजारी उद्योग घटकासाठी पुनर्वसनासाठी कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**सांगली जिल्ह्यातील मिरजेमध्ये तंतुवाद्य निर्मात्यांच्या उद्योगासाठी**
**तंतुवाद्य क्लस्टर उभारण्याबाबत**

**(४६) २५६७९ (३१-०७-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील मिरजेमध्ये तंतुवाद्य निर्मात्यांच्या उद्योगासाठी तंतुवाद्य क्लस्टर उभारण्याचा निर्णय लघू उद्योग विकास महामंडळाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तंतूवाद्य क्लस्टर योजनेचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, सदर तंतूवाद्य निर्मात्यांच्या उद्योगासाठी तंतूवद्य क्लस्टर केव्हापर्यंत उभारण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०९-२०१५) :** (१) होय.

(२) महाराष्ट्र शासनामार्फत लघुउद्योग घटक व हस्तकला कारागीर यासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना राबविण्यात येते. या योजनेत जास्तीत जास्त रु.५.०० कोटी पर्यंत सहाय्य देण्यात येते. यापैकी ७०% रक्कम ही महाराष्ट्र शासनामार्फत देण्यात येते व उर्वरित ३०% रक्कम ही संबंधित उद्योग समूहाच्या प्रतिनिधीकडून जमा करण्यात येते. या योजनेअंतर्गत हा उद्योग समूह एका सामुहीक सुविधा केंद्राची स्थापना करतो. या सामुहीक सुविधा केंद्रामध्ये संबंधित उत्पादनाच्या गुणवत्तावाढीसाठी उच्च प्रतीची यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देणे, कच्चा माल पुरवठ्यासाठी बँक तयार करणे तसेच मालाच्या विक्रीसाठी व प्रदर्शनासाठी मदत करणे इ. या सामुहीक सुविधा केंद्रामार्फत देण्यात येतात.

(३) महामंडळाने याबाबत निदानोपयोगी अभ्यास अहवाल (Diagnostic Study report) तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण केली असून शासनाच्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजनेअंतर्गत सदर प्रस्ताव सह संचालक, उद्योग संचालनालय यांना सादर करण्यात आला आहे व हे केंद्र उभारण्यासाठी साधारणः २/३ वर्षाचा कालावधी अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी निवडण्याचे अधिकार तहसिलदारांना देण्याबाबत**

**(४७) २६१९४ (३०-०७-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी निवडण्याचे अधिकार तहसिलदारांना देण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येत आहे ?
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. राजकुमार बडोले (२३-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे. अशा स्वरुपाचा निर्णय दि.०५ मे, २०१५ रोजी घेण्यात आला आहे.
(२) याबाबत शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून म्हणजे दि.०५ मे, २०१५ पासून सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील निराधार अनुदानापासून वंचित असल्याबाबत**

**(४८) २७०५६ (३०-०७-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तीन लाख निराधारांना आर्थिक अनुदानापासून वंचित असल्याचे माहे जून, २०१५ च्या तिस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय वृध्दापकाळ योजनेत १८ लाख, विधवा पेन्शन योजनेत ३ लाख व अपंग योजने अंतर्गत ३ टक्के पात्र लाभार्थी अनुदानापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०९-२०१५) :** (१), (२) व (३) केंद्र शासनाने इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेकरिता २२.८१ लक्ष, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेकरिता ९.२४ लक्ष व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेकरिता ९०५१८ असे मिळून ३२.९६ लक्ष लाभार्थ्यांचे उद्दिष्ट राज्यास दिले आहे. त्यापैकी इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजनेत १२.२७ लक्ष, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन

योजनेत ४४६०० व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेत ७२५४ एवढे लाभार्थी लाभ घेत आहेत.

इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेत ८० टक्के अपंगत्वाची अट असल्याने तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेत ४० वर्षापेक्षा जास्त वयाची अट असल्याने लाभार्थ्यांचे प्रमाण कमी असल्याचे केंद्र शासनास कळवून त्यास अनुसरून अपंगत्वाची अट ४० टक्के व विधवा महिलांच्या वयाची अट शिथील करण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे. तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेमध्ये लाभार्थी संख्या वाढावी या हेतूने लाभार्थ्यांस सज्ञान मुले असली तरीसुध्दा लाभ द्यावा अशीही विनंती केंद्र शासनास केली आहे. या योजना जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी विविध माध्यमातून प्रसिध्दी व प्रसार करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मेळघाट (जि.अमरावती) येथील अपंग लोकांना प्रमाणपत्र न दिल्यामुळे शासकीय योजनेचा लाभ मिळत नसल्याबाबत**

**(४९) २७०६७ (३०-०७-२०१५). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि.अमरावती) परिसरामध्ये जवळजवळ ५ हजार पेक्षा जास्त अपंग आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपंगाने शासनाकडे योग्य ते पुरावे दिले असतानाही त्यांना अजूनही मदत मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने अद्यापही अपंग लोकांना प्रमाणपत्र न दिल्यामुळे त्यांना कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन या अपंगांना प्रमाणपत्रे केव्हा देणार आहे तसेच त्यांना लाभ मिळणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) मेळघाट (जि.अमरावती) येथील अपंग लोकांना प्रमाणपत्र देण्याकरिता अपंग पुनर्वसन केंद्र, अमरावती, जिल्हा शल्य चिकित्सक, अमरावती व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २२/५/२०१५ रोजी उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय येथे अपंगांसाठी शिबीर घेऊन ९०१ अपंग व्यक्तींची तपासणी करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आवश्यक असलेला नॉन क्रिमीलिअर दाखला तीन वर्षासाठी देण्याबाबत**

**(५०) २७७३७ (३०-०७-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आवश्यक असलेला नॉन क्रिमीलिअर दाखला तीन वर्षासाठी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०९-२०१५) :** (१) व (२) शासन परिपत्रक दि.१७ ऑगस्ट, २०१३ अन्वये ज्या विद्यार्थी/उमेदवारांच्या पालकांचे मागील तीन वर्षातील प्रत्येक वर्षाचे उत्पन्न हे जर रु.६ लक्षापेक्षा कमी असेल तर अशा विद्यार्थी/उमेदवारांना तीन वर्षाच्या कालावधीकरिता नॉन क्रिमिलेअरचे प्रमाणपत्र देण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.